**सार्वजनिक वापरातील जमिनी / गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत...**

महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १२ जुलै, २०११.

**वाचा :** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. १०७८/२६१६/७७७/ग-६, दि.२६.३.१९८४.
२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.जमीन १०१९/१०१७/प्र.क्र.५९/ज-१, दिनांक २८.६.१९९९.

**प्रस्तावना :**

ब्रिटीश कालावधीपासून स्थानिक गावकरी / गावाच्या निरनिराळया सार्वजनिक वापरासाठी शासकीय जमिनी संबंधित ग्रामपंचायतीकडे निहित (Vest) केलेल्या आहेत, जसे की गुरचरण / गायरान जमीन, खळवाड, निरनिराळे सार्वजनिक उत्सव साजरे करण्यासाठी जमीन, स्मशानभूमी, सार्वजनिक तलाव इत्यादी.सदर जमिनीवर संबंधित गावाच्या वहिवाटीचे हक्क तथा अधिकार असतात. परंतु अलीकडच्या काळात वर नमूद केलेल्या सार्वजनिक जमिनीचा वापर अनधिकृतरित्या अन्य प्रयोजनासाठी करण्याची प्रवृत्ती मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. त्यामुळे गावकऱ्यांच्या मुलभूत अधिकारावर अनिष्ट परिणाम होत असून गावाच्या मुलभूत गरजा व गुरचरणासाठी अशा जमिनीची दिवसेंदिवस कमतरता भासू लागली आहे. पर्यायाने गावातील गुरचरणासह, सार्वजनिक वापराखालील जमीन, तलाव, सार्वजनिक वापरातील वहीवाटाचे रस्ते, पाणंद रस्ते व अन्य सार्वजनिक वापरातील जमिनीवर होणारी अतिक्रमणे, अनधिकृत बांधकाम व अनधिकृत वापर यामुळे सध्या अत्यल्प प्रमाणात अशा जमिनी उरलेल्या आहेत. अर्थात त्याचा गावकऱ्यांच्या सार्वजनिक सोयी सुविधा तथा वापरावर विपरीत परिणाम झालेला आहे.

२. गायरान जमीन गुरचरणासाठी ग्रामपंचायतीकडे निहित अथवा वर्ग केलेली असते. बऱ्याच वेळेला स्थानिक गावकऱ्यांकडून अथवा ग्रामपंचायतीकडून अनधिकृतरित्या अशा जमिनींचा धार्मीक वा अन्य वास्तूंच्या उभारणीसाठी, व्यापारी स्वरुपाच्या बांधकांमासाठी करण्यात येतो किंवा अशा जमिनीचे वाटप हितसंबंधित व्यक्तीना करण्यात येते. परंतु त्याबाबत स्थानिक महसूल यंत्रणेमार्फत अथवा ग्रामपंचायतीकडून कोणतीही कारवाई होत नाही. पर्यायाने गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापराच्या जमिनी शिल्लक राहत नाहीत अथवा अल्प प्रमाणात शिल्लक राहतात. त्यामुळे ग्रामस्थांच्या सोयी सुविधा व वापरावर बंधने येतात.

३. गुरचरण अथवा गायरान जमिनीच्या वाटपाबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. १०७८/२६१६/७७७/ग-६, दि.२६.३.१९८४ नुसार धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार गायरानासाठी राखुन ठेवलेली जमीन इतरत्र जमीन उपलब्ध नसेल तरच आणि गायरानाचे क्षेत्र त्या गावाच्या एकंदर लागवडीखाली येणाऱ्या

क्षेत्राच्या ५ टक्के पेक्षा कमी होत नाही, याची खात्री झाल्यावरच सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत विचार व्हावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.

133

४. सदर निर्बंधामुळे ग्रामीण भागात त्या गावाच्या मुलभूत नागरी सोयी-सुविधा उदा.पाणी पुरवठा, दवाखाना, शाळा, केंद्र व राज्य पुरस्कृत योजना तथा ऊर्जा पुरवठा इत्यादी करिता जमीन उपलब्ध करुन देणे अंडचणीचे ठरु लागले त्यामुळे शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.जमीन १०१९/१०१७/प्र.क्र.५९/ज-१, दि.२८.६.१९९९ च्या शासन परिपत्रकानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला:-

"सर्वांगीण ग्रामीण विकासाच्या दृष्टीने मुलभूत नागरी सुविधा उदा.पाणी पुरवठा, दवाखाना, शाळा बांधकाम, ऊर्जा पुरवठा इत्यादी प्रयोजनाकरिता जमिनीची आवश्यकता असेल आणि त्या ठिकाणी अन्य शासकीय जमीन उपलब्ध नसेल अथवा ज्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीची आवश्यकता आहे त्या प्रयोजनासाठी अन्य कोणतीही जमीन उपयुक्त नसेल तर अशा प्रकरणात प्रस्तुत प्रयोजनसाठी संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील लागवडीखालील एकूण क्षेत्राच्या किमान ५ टक्के गायरान जमीन शिल्लक राहण्याची अट शिथिल करुन ती जमीन उपलब्ध करुन देण्यात यावी. मात्र, त्याकरीता स्थानिक ग्रामपंचायतीने तसा सुस्पष्ट उलेख करुन ठराव मंजूर करणे व त्या ठरावावर संबंधित कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची शिफारस असणे आवश्यक राहील."

५. शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१, दि.२८.५.२०१० च्या शासन परिपत्रकानुसार गायरान जमीन मंजूर करताना ग्रामपंचायतीच्या ठरावाबरोबरच ग्रामसभेचा सुस्पष्ट ठराव असणे देखील बंधनकारक केले आहे.

६. दि.२८.११.१९९१ च्या शासन निर्णयान्वये दि.१.४.१९७८ ते दि.१४.४.१९९० या कालावधीत मागासवर्गीय आणि इतर भूमीहीन व्यक्तींची शासकीय पड व गायरान जमिनीवर शेतीसाठी झालेली व सदर शासन निर्णयातील अटी/शर्तीनुसार पात्र ठरत असलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा व अपात्र अतिक्रमणे निष्कासित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

७. गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरासाठी ग्रामपंचायतीकडे निहीत केलेल्या जमिनी तसेच गायरान जमिनीवरील अतिक्रमणांबाबत सिव्हील अपिल क्रमांक ११३२/२०११ @ एसएलपी (सी) ३१०९/२०११ जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब राज्य व इतर या याचिकेवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८/१/२०११ रोजी पुढीलप्रमाणे निरिक्षण नोंदविले आहे व आदेश दिले आहेत:-

(१). शतकांपासून गावाच्या ताब्यात असलेल्या सार्वजनिक वापरातील जमिनी (common village land) व गायरान जमिनी गावकऱ्यांच्या विविध उपयोगात आहेत. जसे गुरांना पाणी पिण्यासाठी, धुण्यासाठी तलाव,

135

हंगामाचे धान्य साठवणुकीसाठी जागा, पाणंद रस्ते/वहिवाटीचे रस्ते, पीक मळणीसाठी, मुलांना खेळण्यासाठी, मनोरंजन, सर्कस, रामलिला इत्यादीसाठी मैदान, बैलगाडया स्थानक, जलस्त्रोत, मोकळी जागा व स्मशानभूमी, दफनभूमी इत्यादी प्रयोजनांसाठी गावाच्या ताब्यात होत्या. या जमिनींची मालकी स्थानिक कायद्यानुसार शासनाकडे होती. शासनाने या जमिनींचे व्यवस्थापन ग्रामसभा/ग्रामपंचायतींकडे सोपविले होते. या जमिनींचे सार्वजनिक वापरासाठीच्या जमिनी म्हणून असलेले स्थान अबाधित राखण्यासाठी त्यांना अहस्तांतरणीय (inalienable) वर्ग देण्यात आला होता. असे असले तरी अपवादात्मक परिस्थितीत काही जमीन भूमीहीन शेतमजूर, अनुसूचित जाती / जमातीच्या व्यक्तींना देणे अनुज्ञेय होते यात शंका नाही. मात्र हे अगदी अपवादात्मक परिस्थितीतच करणे अपेक्षित होते. गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापराच्या हक्कांचे इतक्या आस्थेने संरक्षण करण्यात आले होते की, काही कायद्यांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, या जमिनींची मालकी शासनाकडे असली तरी त्यामुळे गावकऱ्यांचे सार्वजनिक हक्क नष्ट होत नाहीत. मात्र स्वातंत्र्यानंतर समाजकंटक लोकांनी बाहुशक्ती, धनशक्ती व राजकीय शक्तीद्वारे मोठया प्रमाणावर सार्वजनिक जमिनी हडप केल्याचे आढळून आले आहे. प्रशासनाचे हेतूपुरसर दुर्लक्ष व स्थानिक शक्तींच्या संगनमताने हे साध्य करण्यात आले आहे. सबब, सर्व राज्य शासनांनी शासकीय गायरान / गुरचरण व ग्रामस्थांच्या सार्वजनिक सोयी-सुविधासाठी असेलेल्या जमिनीवरील अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करुन सदर जमिनी लोकांच्या सार्वजनिक उपयोगासाठी संबंधित ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम तयार करावा.

(२). या कार्यक्रमांतर्गत संबंधित अतिक्रमण धारकांना कारणे दाखवा नोटीस देऊन संक्षिप्त सुनावणी घेण्यात येऊन त्वरेने अपात्र अतिक्रमणे निष्काषित करण्याची कार्यवाही करावी.

(३). अशी अतिक्रमणे खुप कालावधी पासूनची आहेत किंवा त्यावरील बांधकामावर प्रचंड खर्च करण्यात आला आहे अशा कारणास्तव कोणत्याही अतिक्रमणास संरक्षण देण्यात येऊ नये तथा अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात येवू नयेत.

(४). ज्या प्रकरणात शासनाच्या निर्णयाव्दारे भूमीहिन शेतमजूर, अनुसूचित जाती / जमातीतील व्यक्ती इत्यादींचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत यापूर्वीच निर्णय घेण्यात आला आहे, अशी अतिक्रमणे तसेच शाळा, दवाखाना किंवा इतर सार्वजनिक प्रयोजनार्थ बांधकाम यांची अगोदरच अस्तित्वात असलेली अतिक्रमणे वगळण्यात यावीत.

याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णय :**

८. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की,वरील परिच्छेद ७(४) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त गायरान / गुरचरण व गावाच्या सार्वजनिक वापरातील (common village land) जमिनीवरील अन्य प्रयोजनांसाठी झालेली अतिक्रमणे तथा अनधिकृत बांधकामे फार जुनी असली व बांधकामावर फार खर्च केला असला तरी तात्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी (ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद इत्यादी) विशेष कृती कार्यक्रम तयार करुन करावी. संबंधित तहसिलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस प्रशासनाने त्यांना सर्वतोपरी सहाय्य करावे. सर्व संबंधित विभागांनी ही सामुहीक जबाबदारी म्हणून पार पाडावी. तसेच अशा जमिनीवर भविष्यात कोणतीही अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

९. (१) यापुढे गायरान जमीन अथवा सार्वजनिक वापरातील जमीन फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास याबाबत विचार करावा.

(२) गायरान / गुरचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येऊ नये.

(३) वरील अ.क्र.१ मध्ये नमूद प्रयोजनासाठी जमीन मंजूर करताना पुढील अटी/शर्तींचे पालन करण्यात यावे.:-

(अ) ग्रामसभेचा व ग्रामपंचायतीचा जमीन मंजूरीसाठी सुस्पष्ट ठराव असावा.

(ब) उक्त ठरावास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची मान्यता असावी.

(क) जमीन मंजूर करताना किमान आवश्यक जमिनीबाबत (Bonafide Area Requirement) खात्री करण्यात यावी. त्याकरिता नियोजित आराखडे, नकाशे प्रस्तावासोबत असावेत.

(४) सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) व सार्वजनिक सुविधा (Public Utility) याबाबत संभ्रम निर्माण झाल्यास राज्य शासनाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.